**विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ३० जून, २०१० च्या अधिसूचनेमध्ये आयोगाने दि. १३ जून, २०१३ रोजी केलेली दुसरी सुधारणा राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष पदांना लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण २०१६ प्र.क्र.८८/१६/विशि-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: १५ ऑक्टोबर, २०१६

**वाचा**

१) शासन निर्णय क्रमांकः एनजीसी २००९ प्र.क्र (२४३/०९)/विशि-१, दि. १२ ऑगस्ट, २००९.
२) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F-३.१/२००९, दि. ३० जून, २०१०
३) शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण २०११/(२५/११)विशि-१, दि. १५ फेब्रुवारी , २०११.
४) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र. F-१-२/२००९,(EC/PS) दि. १३ जून, २०१३.

**प्रस्तावना**

विद्यापीठ अनुदान आयोगाने संदर्भ क्रमांक २ येथील दि.३० जून, २०१० च्या अधिसूचनेन्वये केंद्रीय विद्यापीठे व महाविद्यालये/ संस्था मधील शिक्षक व समकक्ष पदांवरील नियुक्त्या, सदर पदांचे किमान शैक्षणिक अर्हता इ. निश्चित केल्या आहेत. तसेच सदर पदांवरील अध्यापकांच्या वेतनश्रेण्या, अनुषंगिक लाभ, वेतनवाढी इत्यादी बाबत आदेश दिलेले आहेत. सदर अधिसूचना संदर्भ क्र. ३ च्या शासना निर्णय दि. १५ फेब्रुवारी, २०११ अन्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदांच्या संदर्भात लागू करण्यात आलेली आहे. संदर्भ क्र. ४ च्या दिनांक १३ जून, २०१३ च्या अधिसूचनेन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचने संदर्भात दुसरी दुरुस्ती निर्गमित केली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १३ जून, २०१३ च्या अधिसूचनेन्वये दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेमध्ये दुरुस्ती केलेली आहे. सदर दुरुस्ती राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदांच्या संदर्भात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १३ जून, २०१३ च्या अधिसूचनेतील दुसरी दुरुस्ती शासन स्वीकृत करीत आहे. त्यानुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांनी कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१००५१४५३५९७२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Vijay Eknath Sable
Date: 2016.10.18 11:27:51 +05'30'

**( विजय साबळे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 GRAM : UNISHIVAJI
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वी (ईपीएबीएक्स) २६०९००० (सलंग्नता विभाग - २६०९०८९, २६०९१३६)
ई-मेलः affiliationt1@unshivaji.ac.in

Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28 th Rank

जा.क्र. संलग्नता/API/टे-१/प्रशांत/ 158 दिनांक 15 NOV 2016

प्रति,

मा. प्राचार्य,संलग्न महाविद्यालये व संचालक, मान्यताप्राप्त शिक्षण संस्था यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

संचालक

**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**

सदरचे पत्र/ परिपत्रक/शासन निर्णय विद्यापीठ WWW.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD-Affiliation-T-१ Circulars या ठिकाणी उपलब्ध आहे